**नि.क्र. ०१ वरील आदेश.**

१. सदर अर्ज अर्जदार विठ्ठल भागुराम कलमे यांनी पोलीस स्टेशन किनगांव येथील गुन्हा रजि.क्र.१७७/२०२२ भारतीय दंड विधान कलम ३६३, मधील जप्त वाहन हिरो पॅशन प्रो मोटारसायकल ज्याचा नोंदणी क्र. एम.एच. २४–ए.सी.–१२९०, चेसीस क्र.MBLHA10AWCHM64857 इंजीन क्र. HA10ENCHM46373 हे वाहन अर्जदाराच्या मालकीचे असल्याबाबत कथन केले आहे. सदर वाहन हे पोलीस ठाणे, चाकूर येथे जप्त आहे. सदर वाहन हे फौजदारी प्रक्रियेच्या कलम ४५७ प्रमाणे परत मिळण्यासाठी अर्जदाराने अर्ज दाखल केलेला आहे.

२. तपासिक अंमलदार यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र. ५ वर सादर केले आहे. त्यांनी असे कथन केले की, जप्त मुद्देमाल मुळ कागदपत्रे बघून अर्जदारास परत करण्यास त्यांची कांही हकरत नाही. तसेच सहा. सरकारी अभियोक्ता यांनी लेखी म्हणणे सादर करुन गुन्हयाचे स्वरुप आणि तपासिक अधिकारी यांचे म्हणणे विचारात घेता योग्य तो आदेश करण्याबाबत कथन केले आहे.

३. अर्जदाराचे वकीलांचा व सहा. सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद ऐकला. आर.सी. बुकची, अर्जदाराच्या आधार कार्डची इ. कागदपत्रांच्या प्रती दाखल केल्या आहेत.

४. उपलब्ध कागदपत्रांवरुन अर्जदार जप्त वाहनाचा ताबेदार असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते. इतर कोणत्याही व्यक्तींनी अर्जदाराला जप्त वाहन देण्यासंदर्भात आक्षेप नोंदवलेला नाही.

५. प्रथम खबर अहवाल खबरीवरुन आजच्या घडीला असे दिसून येते की, भारतीय दंड विधान कलम ३६३ नुसार दाखल झालेल्या गुन्हयात सदर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जप्त वाहनाचा वैध विम्या बाबातचे कोणतेही कागदपत्रे दाखल करण्यात आलेले नाही. त्या कारणाने अर्जदाराला तात्पुरत्या स्वरुपात वाहन परत करताना काही अटी व निर्बंध हे प्रकरणाचे स्वरुप लक्षात घेवून लादणे आवश्यक आहे. त्या कारणाने मी खालील आदेश पारीत करतो.

– **आदेश** –

| | |
|---|---|
| १. | सदरचा अर्ज अंतरीम स्वरुपात खालील अटीवर मंजूर करण्यात येतो. |
| २. | अर्जदार नामे विठ्ठल भागुराम कलमे यास जप्त मुद्देमाल हिरो पॅशन प्रो मोटारसायकल ज्याचा नोंदणी क्र. एम.एच. २४–ए.सी.–१२९०, चेसीस क्र.MBLHA10AWCHM64857 इंजीन क्र. HA10ENCHM46373 हे वाहन रु.६०,०००/–(रुपये साठ हजार फक्त) इतक्या बंधपत्रावर जप्त वाहनाचा ताबा अंतरीम स्वरुपात अर्जदाराला देण्यात येतो. |
| ३. | अर्जदाराने वरील वाहन मुद्देमालामध्ये प्रकरणाचा अंतीम निकाल लागेपर्यंत कोणत्याही प्रकारे फेरबदल या न्यायालयाच्या परवानगीशिवाय करु नये. |
| ४. | अर्जदाराने वरील वाहनामध्ये प्रकरणाचा अंतीम निकाल लागेपर्यंत कोणत्याही ति–हाईत इसमास विक्री, गहाण व ई. बाबतचा करार या न्यायालयाच्या परवानगीशिवाय करु नये. |
| ५. | अर्जदाराने भविष्यात न्यायालयाच्या आदेशान्वये जप्त वाहन गरज पडल्यास हजर करावे. |

| | |
|---|---|
| ६. | अर्जदार याने जप्त वाहनाच्या तपासणी करण्यासंदर्भात ज्या वेळी तपासिक अधिकारी निर्देश देतील त्यावेळी सदरील जप्त वाहन हे तपासणी कामी हजर ठेवावे. तसेच न्यायालय ज्यावेळी जप्त वाहन हजर करण्याचे निर्देश अर्जदाराला देतील त्यावेळी ते हजर करावे. |
| ७. | अर्जदाराने वरील जप्त वाहनाचे चालू वर्षाचे वैध विम्याचे कागदपत्राच्या सत्यप्रती आणि बंधपत्र या न्यायालयात दाखल केल्यानंतर वाहनाचा ताबा हा अर्जदाराला दयावा व तो देण्यापुर्वी त्या वाहनाचे चारही बाजुंनी फोटो काढून जतन करावे व संबंधीत कागदपत्रे तपासिक अंमलदार यांनी फौजदारी नियमीत खटला क्र. २८४/२०२२ मध्ये दाखल करावे. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRASHANT PRAKASHRAO KALE
Date: 2022.11.16 17:03:29 +0530

(पी.पी. काळे)

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग

दिनांक : १६.११.२०२२ चाकूर.